शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ■ शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०१८ ■ RNI Reg.No .: एमएएचएमएआर/२००५/१८६८१ ■ वर्ष १५ ■ अंक ४ ■ पाने १२ (मुंबई प्रहारसह) ■ ₹ ४.००

## दीपस्तंभ राज्यस्तरीय पुरस्काराने शिवकृपा सहकारी पतपेढी सन्मानित

▸▸ मुंबई (वार्ताहर) :



सहकार क्षेत्रामध्ये गेली ३६ वर्षे दीपस्तंभासारखे आदर्शवत काम करीत असलेल्या शिवकृपा सहकारी पतपेढीला महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्यामार्फत ''दीपस्तंभ राज्यस्तरीय पुरस्कार सन २०१८'' देऊन गौरविण्यात आले. सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार लोणावळा येथे देण्यात आला.

राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर प्र. सहकार आयुक्त सतीश सोनी, संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक संचालक चंद्रकांत वंजारी, माजी अध्यक्ष अविनाश भोसले, संचालक अशोक तुपे, बबन काटे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील पतसंस्थांमध्ये गुणात्मकदृष्ट्या प्रथम क्रमांकावर, तर खेळत्या भांडवलाच्या क्रमवारीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या पतपेढीचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून एकूण ८७ शाखा आहेत.

संस्थेच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणून त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संस्थेची सात स्वतंत्र विभागीय कार्यालये व ठाणे येथे प्रशस्त प्रशासकीय कार्यालय कार्यरत आहे. तसेच संस्थेच्या रबाळे नवी मुंबई येथील नवीन प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचा भूमीपूजन समारंभ देखील नुकताच संपन्न झाला आहे.